## वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाचा नमुना
## पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम,२०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि दिनांक २३.०६.२०२२ च्या सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तुरतुदींनुसार पोलीस अधीक्षक, वर्धा यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली २० पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीव्दारे **दिनांक ०५-०३-२०२४ ते दिनांक ३१-०३-२०२४** या कालावधीत स्वीकारण्यात येतील. हया बाबतची सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यातआली आहे.

- उमेदवारास पोलीस अधीक्षक, वर्धा यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरिता संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहीती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्यावर रदद होईल.
- पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यात येईल व त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही सर्व पोलीस घटकामध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवूनच अर्ज भरावा.
- भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारीरीक चाचणी घेण्यात येणार आहे. शारीरीक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवारांमधुन संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्केपेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.
- सर्व पोलीस घटकामध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवून आवेदन अर्ज भरावा.
- शारीरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमुद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधुन एक गुणवत्तायादी तयार केली जाईल. तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवारांची निवड तात्पुरती ( Provisional selection) असेल. शारीरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दिनांक १०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्तायादी तयार करण्यात येईल.
- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारीरीक पात्रता आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहीती, परिक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहीती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सुचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहीरातीमध्ये उपलब्ध आहेत.

सदरहु जाहीरात उमेदवारांनी काळजी पुर्वक वाचुन , समजुन घ्यावी तसेच सामाजिक,समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १ % आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.

- भरती प्रक्रियेदरम्यान शारीरीक चाचणी व लेखी चाचणी मध्ये निश्चीत केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहील्यास, त्यास भरती प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही .

- उमेदवारांनी संकेतस्थळावर जाऊन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतू खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.

- पदोन्नतीवरील आरक्षणा संदर्भात शासनाने मा.सर्वोच्य न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णया विरुध्द मा. सर्वोच्य न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहीती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

( नूरुल हसन)भा.पो.से.
पोलीस अधीक्षक,वर्धा.

**संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात**

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०२२-२०२३

## पोलीस अधीक्षक,वर्धा.

जाहिरात क्रमांक :पोअव/कक्ष-६/प्रलि/आस्था/पो.भ.२०२२-२०२३/1739 वर्धा, दिनांक :- २९-०२-२०२४ 29 FEB 2024

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक २३.०६.२०२२ च्या आदेशांन्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस अधीक्षक,वर्धा. यांच्या आस्थापनेवर सन २०२२-२०२३ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी २० पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

**१) पोलीस शिपाई**

| | अ.जा. | अ.ज. | वि.जा.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इडब्ल्यूएस | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | ३ | १ | १ | १ | १ | - | - | ४ | २ | २ | ५ | २० |
| कप्पीकृत आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| सर्वसाधारण | २ | १ | १ | १ | १ | - | - | २ | १ | १ | २ | १२ |
| महिला | १ | - | - | - | - | - | - | १ | १ | १ | २ | ६ |
| खेळाडु | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भुकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| अंशकालीन पदवीधर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पोलीस पाल्य | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| गृहरक्षक दल | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनाथ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ २०२२/प्र.क्रं.१२२ का-०३ दिनांक ०६-०४-२०२३ तरतुदीनुसार एकुण रिक्त पदाच्या १ % इतकी पदे | | | | | | | | | | |

महत्वाची टीप :- १)बॅन्डस्मनची पदे रिक्त नाहीत.

२) चालक पोलीस शिपाई ची पदे रिक्त नाहीत.

| अक्र | संस्था/कार्यालयाचे नाव | दुरध्वनी/मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक,वर्धा कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | ०७१५२-२३२५०० |

( नूरुल हसन )

पोलीस अधीक्षक,वर्धा.